# पोलीस उप आयुक्त,पिंपरी चिंचवड शहर
कार्यालय,चिंचवड,प्रेमलोक पार्क, पुणे -४११०३३
दुरध्वनी क्र. ०२० - २६२०९११३


जा.क्रं./पिं.चिं/विशा-२/पनानोंवि/249/२०२४ दिनांक :- १२/०२/२०२४

## प्रेसनोट (दि.१२/०२/२०२४)

***मेडीकल व आयुष व्हिसा पोर्टल वापराबाबत अधिसुचना***

देशातील वैद्यकीय व्हिसा सेवा सुव्यवस्थित व नियमित करण्याच्या उद्देशाने तसेच रुग्णालये/आरोग्य केंद्रे यांचेकडून परकीय नागरिकांना पुरवण्यात येणा-या वैद्यकीय सेवा बाबतचे वैद्यकीय व्हिसा इन्व्हीटेशन पत्रे तयार करण्याची प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी फॉर्म सी पोर्टलमध्ये "Medical and Ayush Visa Portal" नव्याने विकसित करण्यात आले आहे.

मेडीकल व आयुष व्हिसा पोर्टलचा उद्देश रुग्णालयांना indianfrro.gov.in / frro / medicalvaluetravel/ चा वापर करुन वैद्यकीय व्हिसा इन्व्हीटेशन पत्रे व वैद्यकीय व्हिसा इन्व्हीटेशन पत्रे सोयीस्कर रित्या तयार करणे हा आहे. रुग्णालये/आरोग्य केंद्रे/योगा सेंटर यांनी सदर पोर्टलवर नोंदणी करुन मेडीकल व्हिसा इ. त्या परकीय नागरिकांची संपूर्ण सविस्तर माहिती भरणे अपेक्षित आहे. फॉर्म सी च्या पोर्टलवर जी रुग्णालये आहेत ती नोंदणीकृत असल्याचे मानले जाईल.

सदरचे पोर्टल वापरुन तयार करण्यात आलेल्या मेडीकल व्हिसा इन्व्हीटेशन पत्रामध्ये युनिक आयडी UID नमुद असेल. सदरचा युनिक आयडी अर्जदाराने (परकीय नागरिकाने) व्हिसा ॲप्लीकेशन फॉर्ममध्ये नमूद करणे गरजेचे आहे. याव्यतिरिक्त रुग्णालयांनी फॉर्म सी नेहमीप्रमाणे भरावयाचे आहेत.

तरी सर्व रुग्णालयांना या अधिसुचनेव्दारे सुचित करण्यात येते की, यापुढे indianfrro.gov.in/frro/medicalvaluetravel/ वर लॉग इन करून पुढील प्रक्रियेचा अवलंब करावा. तसेच सदरबाबत कोणतीही शंका असल्यास परकीय नागरिक नोंदणी विभाग (FRO) पिंपरी चिंचवड, मा.पोलीस आयुक्त कार्यालय, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे येथे संपर्क साधावा.

Dy. Commr. of Police, Spl. Br. & F.R.O. * Pimpri Chinchwad *

12.2.2024.
(संदिप डोईफोडे)
पोलीस उप-आयुक्त
विशेष शाखा, पिंपरी चिंचवड